# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

'विद्याविहार', पो.लोणेरे- ४०२ १०३, ता. माणगाव (कोकण रेल्वे)

जिल्हा- रायगड. (महाराष्ट्र राज्य) भारत.

registrar@dbatu.ac.in दुरध्वनी क्रमांक : 02140-275142/275212


क्रमांक : डॉबाआंतंवि/विकवि/दुष्काळग्रस्त/२०१९-२०२०/230

दिनांक : 20 JAN 2020

प्रति,

प्राचार्य

सर्व संलग्नित संस्था

विषय : बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यानी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्याक्रमांकरीता प्रवेश घेतलेला आहे अशा दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीबाबत.

संदर्भ : १. शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०१९/प्र.क्र.३५३/तांशी -४ दि. २२/११/२०१९

२. तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१९/८६४ दि. २९/११/२०१९

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात राज्य शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांची परिक्षा शुल्क माफीसाठीचा प्रस्ताव या विद्यापीठाकडे मागविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संबंधित प्रस्तावातील विद्यार्थ्यांना डॉ. राजर्षी शाहू महाराज शिष्यवृती तसेच भारत सरकार शिष्यवृत्ती व फ्रीशिप शिष्यवृत्ती व परिक्षा शुल्क रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहे किंवा नाही याबाबत उपरोक्त संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यानुसार दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीबाबतची योग्य ती शाहनिशा करुन खाली दर्शविण्यात आलेल्या कागदपत्राची पुर्तता करुन प्रस्ताव पाठविण्यात यावेत, जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्काचा परतावा वेळेत करता येईल. खालील कागदपत्राची पूर्तता करुन असे परिपूर्ण अर्ज दिनांक ०५/०२/२०२० पर्यत विद्यापीठाकडे सादर करावेत.

१. दुष्काळग्रस्त गावातील रहिवासी असल्याबाबतचा दाखला तहसिलदार यांचे सहीची मूळ प्रत
२. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षाचे उत्पन्नाचा दाखला छायांकित प्रत
३. स्वतःच्या नावे असलेल्या बॅक पास बुक छायांकित प्रत
४. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षातील परिक्षा शुल्क भरलेली पावतीची छायांकित प्रत
५. विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक असल्यास त्यास देय असलेल्या रकमेचा उल्लेख करण्यात यावा.
६. रहिवाशी दाखला (डोमीसाईल सर्टिफिकेट)
७. आधार कार्ड छायांकित प्रत

आपला विश्वासू,

(डॉ. एम. सदय्या)

प्र. कुलसचिव

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१.मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी,**

०१. वित्त अधिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

०२. परिक्षा नियंत्रक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

**प्रत :** ०१. अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

०२. डॉ.एस. एन नलबलवार, अधिष्ठाता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

०३. संलग्निकरण कक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

Scanned by CamScanner